




# शासकीय तंत्रनिकेतन,नांदेड

वीर सावरकर मार्ग,बाबानगर नांदेड–४३१६०२

दूरध्वनी संदेश;०२४६२–२५४२१० फॅक्स– २५२५२०

ईमेल–principal.gpnanded@dtemaharashtra.gov.in

**website: www.gpnanded.org.in**


## मेस / कँटीन करिता व्यवस्थापक पाहिजे

या संस्थेतील मेस/ कँटीन चालविण्यासाठी मेस व्यवस्थापक म्हणून ठेका पद्धतीने चालविण्यास देणे आहे. त्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

संस्थेतून कोरे दरपत्रक कार्यालयीन वेळेत विकत घेणे (किमत रु. 2360/-) **दि.09/07/2026 ते 23/07/2026**

संस्थेत मोहोरबंद दरपत्रक व संपूर्ण अर्ज कार्यालयीन वेळेत स्वीकारणे **दि.09/07/2026 ते 23/07/2026**

अटी व शर्ती - www.gpnanded.org.in वर अथवा सूचनाफलक पहावे.

अधिक महितीसाठी प्रत्यक्ष संस्थेस भेट द्यावी अथवा संस्थेचे संकेतस्थळ पहावे.

डा एन एल जानराव

प्राचार्य / अध्यक्ष

विध्यार्थी सहकारी ग्राहक भांडार

शासकीय तंत्रनिकेतन नांदेड

# शासकीय तंत्रनिकेतन नांदेड

## विद्यार्थी सहकारी ग्राहक भांडार

मेस/कॅन्टीन व्यवस्थापकासाठी नियम व अटी खालील प्रमाणे राहतील

1. अर्जा सोबत Earnest Money Deposit RS.100000/- DD स्वरूपात जमा करण्यात यावेत. सदरील DD "Student Co-operative Society Government Polytechnic Nanded" यांच्या नावे काढावा.
2. कोरी दरपत्रक किमत 2360/- (दोन हजार तीनशे साठ रुपये )
3. आपली निवड झाल्यास मेस/कॅन्टीनचा ताबा घेण्यापूर्वी रुपये 100000/-( एक लाख रुपये फक्त) अनामत रक्कम विद्यार्थी सहकारी ग्राहक भांडारकडे जमा करावी लागेल.
4. मेस कॅन्टीनचे भाडे प्रतिमाह रुपये 12000/- (नियमांनुसार कमी किंवा जास्त होऊ शकेल ). भाडे महिन्याच्या पाच तारखेच्या आत जमा करावे अन्यथा दंड आकारले जाईल.
5. विद्युत शुल्क मुलांचे व मुलींचे वसतीग्रहकरिता स्वतंत्र मीटर प्रमाणे दर महिन्याच्या पाच तारखेच्या आत जमा करावे लागेल.
6. फर्निचर जे उपलब्ध असतील ते पुरवण्यात येईल व राहिलेले व्यवस्थापनाने स्वतः आणावे लागेल.
7. जेवणाचा वेळ सकाळी 8.30 ते10.15 व संध्याकाळी 6.30 ते 8.30 पर्यंत राहील.
8. मेस व कॅन्टीनला सुट्टी द्यायची असल्यास अध्यक्षांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.
9. मेस व्यवस्थापक यांना स्वतः हजर राहून कामे पार पाडावे लागेल. परस्पर कोणालाही पोटभाड्याने (Subletting ) काम देता येणार नाही.
10. मुलींच्या मेस साठी सर्व कामगार महिला असणे बंधनकारक आहे.
11. मेस / कॅन्टीनमध्ये बाल कामगार ठेवू नये. तसेच सर्व कायदेशीरबाबींची जबाबदारी व्यवस्थापकाचीच राहील. उदा.(Commercial Gas cylinder)
12. मेस/कॅन्टीन संदर्भातील दैनंदिन नियमावली जसे फीस विद्यार्थ्यांचे खाडे इत्यादी नियंत्रणसमिती ठरवून देईल व तशा स्पष्ट सूचना फलकावर लावाव्यात.
13. कॅन्टीन मध्ये बनविण्यात येणाऱ्या खाद्यपदार्थांचे दर विद्यार्थी ग्राहक भांडाराच्या समितीने ठरवावेत.
14. शिळे व उघडे अन्न ठेवू नये. कुठल्याही परिस्थितीत जेवणाचा दर्जा उत्तम राखावा. विध्यर्थींना अन्नामुळे आरोग्य विषयी समस्या झाल्यास आपण जबाबदार राहणार.
15. पिण्याचे स्वच्छ पाणी (R.O. water) पुरवण्याची जबाबदारी व्यवस्थापकाची राहील.
16. मेस/कॅन्टीन मध्ये स्वच्छता राखावी व आरोग्यदायी वातावरण राहीलयाची दक्षता घ्यावी.
17. मदतनीस कामगारांची आरोग्य तपासणी प्रत्येक वर्षात किमान एकवेळा करून घेऊन अहवाल सादर करावा.
18. मेस/कॅन्टीन मध्ये फक्त शुद्ध शाकाहारी जेवण बनविण्यास परवानगी आहे कुठल्याही परिस्थितीत मांसाहारी जेवण बनविण्यास किंवा बाहेरील आणून देण्यास वाढण्यास सक्त मनाई आहे.

GOVT. POLYTECHNIC NANDED.

19. जेवणाचा मेनू पोळी,एक भाजी, वरण, भात ,चटणी/ ठेचा , सलाड . पदार्थ बनविण्याकरिता तेल गहू तांदूळ चांगल्या प्रतीचे वापरावे.
20. मेस कॅन्टीन मध्ये सिगारेट बिडी तंबाखू तसेच कुठल्याही मादक पदार्थाचे सेवन करण्यास व ठेवण्यास सक्त मनाई आहे
21. जेवण फराळ चहा कॉफी इत्यादी ठरलेल्या दरात परस्पर बदल करण्याचा अधिकार व्यवस्थापकास असणार नाही.
22. कोणतेही पदार्थ उदाहरणार्थ बिस्किट इत्यादी छापील किमतीपेक्षा जास्त दराने विकता येणार नाही.
23. दरपत्रक ठळक अक्षरात मेस कॅन्टीनमध्ये लावणे बंधनकारक आहे.
24. मेस कॅन्टीनमध्ये मोठ्या आवाजात संगीतगाणे लावता येणार नाही .
25. मेस कॅन्टीन मध्ये विद्यार्थी अधिकारी कर्मचारी इत्यादी सोबत सौजन्याने वागावे कोणाबद्दलही काहीही तक्रार असल्यास अध्यक्षांच्या निदर्शनास आणून द्यावे. नियंत्रण व देखरेख समितीसह कार्य करावे.
26. व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र व अन्न व औषध प्रशासनाचा (FSSAI) उपहारगृह परवाना आवश्यक आहे.
27. विद्यार्थी अधिकारी कर्मचारी यांचेकडील मेस कॅन्टीनचे देणे व्यवस्थापकाने स्वतः वसूल करावे.
28. विजेचा वापर इंधन म्हणून करता येणार नाही पिठाची चक्की वगैरे वापरण्यास सक्त मनाई आहे
29. आपणास व्यवस्थापक म्हणून काम करायचे बंद करायचे झाल्यास एक महिना पूर्वसूचना द्यावी लागेल व आपणावर काही बाकी नसल्यास अनामत रक्कम रुपये /- एक लाख बिनव्याजी परत करण्यात येईल.
30. आपली व्यवस्थापक म्हणून निवड ही शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून असेल व निवड झाल्यापासून 11 महिने लागू राहील. तसेच कोणतीही तक्रार अथवा गैरवर्तन नसल्यास मुदत वाढविण्याचे अधिकार प्राचार्य तथा अध्यक्ष विद्यार्थी सहकारी ग्राहक भांडार शासकीय तंत्रनिकेतन नांदेड यांना राहतील.
31. व्यवस्थापकास वेगळे मानधन देण्यात येणार नाही. त्यांनी स्वतःचे मानधन संबंधित कर्मचाऱ्यांच्या दररोजचा पगार लागणारे साहित्य इत्यादी स्वतः व्यवस्था पहावी.
32. मेस कॅन्टीन मध्ये संस्थेचे विद्यार्थी तसेच अधिकारी कर्मचारी यांच्यासाठी आहे बाहेरील विद्यार्थी यांना परवानगी नाही.
33. मेस कॅन्टीन चा ताबा केवळ मेस कॅन्टीन चालविण्यासाठी दिला आहे इतर कुठल्याही कारणास्तव जागा वापरता येणार नाही.
34. मेस कॅन्टीन मधील इमारतीत संस्थेचे पंखे, लाइट, वॉटरकुलर इत्यादींची संपूर्ण जबाबदारी आपली राहील तसेच इमारतींची दैनंदिन स्वच्छता /रखरखाव इत्यादी व्यवस्थापकास पहावी लागेल.
35. निवड झाल्यास आठ दिवसाच्या आत अनामात रक्कम जमा करावी लागेल. मेस व कॅन्टीन सुरू करावी लागेल.
36. अर्ज करण्यापूर्वी आपण इमारत पहावी व इतर सोयी सुविधा पारखून पाहाव्यात पुन्हा कसलीहीत कारणे ऐकून घेतली जाणार नाही.
37. निवड झाल्यास अटी नियममान्य असल्याचे लिहून द्यावे लागेल.
38. ज्याची निवड होणार नाही त्यांना त्यांचा ईएमडी धनादेश 15 दिवसात परत करण्यात येईल.
39. ज्यांची निवड होईल त्यांनी दिलेल्या वेळेत अनामात रक्कम भरून मेस कॅन्टीन सुरू केली नाही तर इएमडी रक्कम जप्त करण्यात येईल.
40. चारित्र्य प्रमाणपत्र (पोलिसांनि प्रमाणित केलेले ) देणे बंधनकारक राहील. तसेच आपल्या कामगारांचे चारित्र्य प्रमाणपत्र दोन प्रतिष्ठित व्यक्ती अथवा राजपत्रित अधिकारी यांनी प्रमाणित केलेले प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे व सदर प्रमाणपत्र अर्जा सोबत जोडावेत

GOVT. POLYTECHNIC NANDED.

41. व्यवस्थापक म्हणून नियुक्ती ही केवळ शैक्षणिक वर्षपासून 11 महिने करिता असून केव्हाही रद्द करण्याचे अधिकार प्राचार्य तथा अध्यक्ष विद्यार्थी सहकारी ग्राहक भांडार शासकीय तंत्रनिकेतन नांदेड यांनी राखून ठेवत आहेत.

42. जीएसटी नोंदणी असल्यास नोंदणी प्रमाणपत्राची छायांकित प्रतसोबत जोडावी.

43. निवड झाल्यावर अटी शर्ती मान्य असल्याचे लिहून देऊन नोटरी करावी लागेल.

44. वरील अटी शिवाय कुठल्याही नवीन अटी नियम समावेशकरण्याचे अधिकार प्राचार्य तथा अध्यक्षांना राहतील.

45. शासकीय कार्यालयातील मेस कॅन्टीन चालविन्याचा अनुभव प्रमाणपत्र असल्यास प्राधान्य देण्यात येईल .

46. मेस मधील कामगारांचा कायदेशीर बाबीची सर्वस्वी जबाबदारी व्यवस्थापकाची राहील.

47. अर्जा सोबत आयडी प्रूफ आधारकार्ड पॅनकार्ड रहिवाशी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.

48. मागील तीन वर्षाचे आयकर विवरणपत्र असल्यास प्रत सोबत जोडावी.

49. निविदा भरणाऱ्या व्यक्तींनी स्वतः च्या नावावर अर्ज घेणे बंधनकारक आहे.

50. आलेल्या अर्जांची छाननी होऊन दर पाहून तसेच अनुभवाबाबत विचार करून कुठलाही अर्ज स्वीकारणे नाकारण्याचे अधिकार प्राचार्य तथा अध्यक्ष विद्यार्थी सहकारी ग्राहक भांडार शासकीय तंत्रनिकेतन नांदेड यांनी राखून ठेवत आहेत.

51. मेस व कॅन्टीन साठी fire safety प्रमाणपत्र एक महिन्याच्या आत सादर करावे लागेल.

52. आपण नेमलेल्या कर्मचार्यास किमान वेतन कायद्यानुसार वेतन देणे तसेच तद अनुषांगिक बाबी याची जबाबदारी आपली असेल.

53. वर्तमान पत्र कागद खाद्य पदार्थांसाठी वापरण्यात येवू नये.

54. FSSAI कॅन्टीन व मेस परिसरात स्वत्वते नियम पाळणे बंधनकारक राहील.

55. आपण नेमलेल्या कर्मचाऱ्यांना गणवेश , टोपी, मोजे, पुरविण्याची जबाबदारी आपली राहील.

56. तळलेले तेल पुन्हा वापरू नये.

57. कॅन्टीन व मेस मध्ये तयार होणारा ओला व सुका कचरा तसेच वापरलेले तेल महानगर पालिका नियमानुसार विल्हेवाटीची जबाबदारी आपली राहील.

58. धार्मिक कार्यक्रम, वैयक्तिक कार्यक्रम संस्थेत साजरे करू नये.

59. मेस कॅंटीन सुविधा फक्त संस्थेतील विध्यार्थी, अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी आहे , बाहेर डब्बे पुरविण्यात येवू नये.

60. मुलींसाठी मुलांच्या मेस दरपेक्षा 25% कमी दर आकारावे.

वरील सर्व अटी व शर्ती मला विनाशर्त मान्य आहेत

अर्जदाराची स्वाक्षरी

ठिकाण.:-

दिनांक:-

नाव-

पत्ता-

1. ---------------------- साक्षीदार

2. ---------------------- साक्षीदार

GOVT. POLYTECHNIC NANDED.